**<u>जिल्हा उद्योग केंद्र – जिल्हा सल्लागार उप समितीची स्थापना</u>**

महाराष्ट्रशासन

उद्योग, ऊर्जावकामगारविभाग

शासननिर्णयक्र.एसएसआय- 1079/(1365)/उद्योग-5

मंत्रालय, मुंबई 400 032

**दिनांक**12**सप्टेंबर,1979**

**वाचा - (1) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक एसएसआय-1078/(1023)/उद्योग-5, दिनांक 2 मे 1979**

**(2) उद्योग आयुक्त, मुंबई यांचे पत्र क्र: डिआयसी/8/78/79/5470, दिनांक 23 ऑगस्ट 1979**

**शासन निर्णय :- शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक एसएसआय-1078/(1085)/ उद्योग-5 दिनांक 15 मार्च 1979 अन्वये स्थापन केलेल्या जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यासाठी, प्रत्येक जिल्हा उद्योग केंद्रासाठी, जिल्हा सल्लागार समितीची स्थापन करण्यात आली असून, या केंद्राच्या कार्यक्रमात शीघ्रता प्राप्त करणेसाठी खालीलप्रमाणे जिल्हा सल्लागार उपसमितीची स्थापना करणेस शासन यादवारे आदेश देत आहे.**

(1) जिल्हाधिकारी - अध्यक्ष

(2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सदस्य

(3) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सदस्य सचिव

1) या समितीला उद्योजकांना रु. 2001 पासून रु. 10,000/- पर्यंत कर्जाच्या सदंर्भात अर्थसंकल्पीय तरतूदींच्या अधिन राहून मंजूरी देण्यास यादवारे आदेश करण्यात येत आहेत.

2) हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र: 872/ सीआर / एएसपी- 16 दिनांक 10-9-1979 अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**स्वाक्षरीत /-**

**( भ. जि. राजाध्यक्ष )**

**शासनाचे अवर सचिव**